# मिरा भाईंदर महानगरपालिका

Mira Bhayandar @2047 Innovate, Connect, Prosper

दिनांक 26/02/2024

## // इतिवृत्तांत //

**श्री. संजय श्रीपतराव काटकर**, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली सोमवार दि.26/2/2024 रोजी सकाळी 10.00 वा. आयुक्त कार्यालय, सभागृह येथे सर्व विभाग प्रमुख/ खाते प्रमुख यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

**बैठकी दरम्यान मा. आयुक्तांनी दिलेल्या सूचना/निर्देश खालील प्रमाणे-**

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| १. | कर व लेखा विभागातील वसुलीत आढळून येणारी तफावत (ताळमेळ पत्रक तयार करणे). | श्री. संभाजी पानपट्टे, अति आयुक्त (कर)<br>डॉ. कालिदास जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी | चर्चा विनीमय करुन अंतिम रुप द्यावे. | दि.11/3/24 |
| २. | चौकशी अधिकारी यांनी दिलेले निकाल. (त्याची पडताळणी) | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (सा.प्र.) | आता पर्यंत पुर्ण केलेल्या चौकशीत, चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची पडताळणी करुन अहवाल सादर करा. | दि.11/3/24 |
| ३. | STP प्लांट मधील पाण्याचा वापर | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | विकास कामासाठी लागणारे पाणी कोठून घेतले जाते याचा तपास घ्यावा.<br>पाण्याच्या टाक्याजवळ सीसी टिव्ही बसविण्यात यावेत.<br>प्रत्येक विकास कामासाठी विकासक/ मनपा ठेकेदार यांना महापालिका STP प्लांट मधील पाण्याचा वापर करणे बंधनकारक करावे.<br>STP प्लांट मधील वापर केलल्या पाण्याचा मासिक अहवाल प्रसिध्द करावा. | नियमित |
| ४. | महापालिका आस्थापनाच्या सखोल स्वच्छता कार्यक्रम | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (मा.व्य.) | सर्व प्रथम महापालिका आस्थापनातील अडगळ एकत्रित करावी. त्याचे वर्गीकरण करावे. | दि.11/3/24 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | नोंद घ्यावी. त्याची व्हिडीओ शुटीग करावी. त्या वस्तुच्या लिलावाचे नियोजन करावे. तद्नंतर महापालिका मालमत्ताच्या सखोल स्वच्छता बाबत नियोजन करावे. | |
| ५. | संडे गार्डन कार्यक्रमाबाबत | श्रीम.कल्पीता पिंपळे, उपायुक्त (उद्यान) | दि. ०४/१२/२३ ते दि.२५/२/२४ कालावधीत पार पडलेल्या संडे गार्डन कार्यक्रमाचा अहवाल तयार करणे. त्यामध्ये नागरीकांचे अभिप्राय नोंदविणे | दि.4/3/24 |
| ६. | जॉब चार्ट प्रमाणे कामाचे मुल्यांकन. (HR agency) नेमणे. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | HR agency नेमण्याची प्रक्रिया पुर्ण करावी. | दि.11/3/24 |
| ७. | MBMC@२०४७ (वक्ता नेमणे) | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त<br>श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | बौध्द विहार येथे श्रेणी 1 व 2 करीता कार्यशाळेचे नियोजन करावे. श्रेणी 3 मधील जे कर्मचारी इच्छुक आहत त्यांना संधी द्यावी. | -- |
| ८. | बीएसयुपी इमारतीमधील समस्या. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | रहिवाशीयांच्या समस्या जाणून घेणे. त्यांना देण्यात येत असलेल्या सुविधा बाबत मेंटेनन्स घ्यावे. एका अभियंता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. | दि.4/3/24 |
| ९. | सेवा करारावर घेतलेल्या अधिकारांच्या कामाचा आढावा | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | ज्या कर्मचाऱ्यांची आवश्यकता नाही त्याना त्वरीत कार्यमुक्त करावे. | दि.4/3/24 |
| १०. | सफाई कामगारांची वैद्यकिय तपासणी | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (सा.प्र.) | 40 वर्षावरील महिला कर्मचाऱ्यांची मेमोग्राफी तपासणी करावी.<br>सर्व सफाई कर्मचाऱ्यांच्या वैद्यकिय तपासणी करण्यासाठी नियोजन करावे.<br>वैद्यकिय तपासणी सर्व कर्मचाऱ्यांना बंधनकारक करावी. | दि.4/3/24 |
| ११. | सफाई कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युईटी देणे. | श्री अनिकेत मानोरकर | लेखा विभागाने तपासणी करुन नियोजन करावे. | --- |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | अति. आयुक्त (घन. व्यवस्था) | | |
| १२. | मालमत्ता कर वसुली | सर्व नियंत्रण अधिकारी | जे अधिकारी/कर्मचारी नेमून दिलेल्या कामात कामचुकारपणा करीत असल्याचे दिसून येत आहे त्यांच्या विरुध्द कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करावा. | दि.4/3/24 |
| १३. | स्टार सोसायटी स्पर्धा (नियोजन) | श्री. अनिकेत मानोरकर अति. आयुक्त (सार्व. आ.) | यापुर्वी स्टार सोसायटी स्पर्धाचे आयोजन करण्यात येत होते. त्यांची माहिती घ्यावी. त्यामध्ये काही सुधारणा करुन स्पर्धाची नियमावली व रुपरेषेसह आयुक्तांकडे प्रस्ताव सादर करावा. | दि.4/3/24 |
| १४. | कनिष्ठ अभियंता नेमणेबाबत निविदा काढणे. | श्री. मारुती गाँयकवाड, उपायुक्त (मु.)<br>श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता (बांध.) | अनधिकृत बांधकामासाठी नेमलेल्या कनिष्ठ अभियंत्यांच्या यापुर्वीच्या कामाचा अहवाल प्राप्त करुन घ्यावा. ज्यां ठेका अभियंत्याच्या कामकाजाबबत तक्रारी प्राप्त आहेत त्यांची इतरत्र बदली करावी.<br>नवीन कनिष्ठ अभियंता नेमण्यासाठीची निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पार पाडावी. | दि.11/3/24 |
| १५. | महापालिका वर्धापन दिन व मराठी भाषा दिवस साजरा करणे. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.)<br>श्री. संजय शिंदे, उपायुक्त (शिक्षण)<br>श्रीम.कल्पीता पिंपळे, उपायुक्त (मबाक) | महापालिका वर्धापन दिन व महिला दिनांचे औचित्या साधुन दिनांक 8/3/24 रोजी कार्यक्रमाचे नियोजन करावे.<br>यादिवशी महिलाच्या सहभागातून डीप क्लीनींग ड्रायव्ह घेण्यात येणार आहे याकरीता जास्तीत जास्त महिलांचा सहभाग यामध्ये होईल यासाठी कॉलेज विद्यार्थ्यांनी, विविध पंथ, स्वाध्यायातील महिलांना या मोहिमेत सहभागी होण्यासाठी आवाहन करावे. | |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | दि.27/2/24 रोजी होणाऱ्या मराठी भाषा दिन साजरा करण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन करावे. | |
| १६. | मनपा वाहन चालक यांचे आरोग्य परिक्षण अहवाल. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | उर्वरित वाहन चालकांचे वैद्यकिय तपासणी करुन अहवाल प्राप्त करुन घ्यावा. वैद्यकिय तपासणीत जे असक्षम आहेत त्यांना सेवा निवृत्त करावे तसेच ठेकेदाराकडील असक्षम वाहन चालकांच्या बदली सक्षम वाहन चालक उपलब्ध करुन देण्याबाबत सुचित करावे. | दि.11/3/24 |
| १७. | स्टार शाळा (नियोजन) | श्री. संजय शिंदे, उपायुक्त् (शिक्षण) | स्टार शाळा स्पर्धा आयोजित करण्यासाठी रुपरेषा, नियमावली तयार करावी. | दि.11/3/24 |
| १८. | अग्निशमन वाहनांची दुरुस्ती व निगा बाबत. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त् (अग्निशमन) | याबाबत संगणक आज्ञावली तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. असे उपायुक्त् (अग्नि.) यांनी बैठकीत सांगितले. त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी. | दि.11/3/24 |
| १९. | अग्रीम समायोजन | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी ज्या आस्थापनेवर कार्यरत आहेत त्या आस्थापनेकडून त्यांच्या वेतनातून अग्रीम रक्कमेचे समायोजन करुन घेणे करीता, मा. प्रधान सचिव, नवी -2 यांनाआयुक्तांचे स्वाक्षरी पत्र द्यावे. | दि.4/3/24 |
| २०. | मैदाने भाडयाने देणे. (धोरण प्रसिध्दी) | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (मिळकत) | महापालिकेने आता पर्यंत कोणकोणत्या संस्थेना, कोणत्या कारणासाठी मैदाने भाडयाने दिली आहेत. त्यांची माहिती संकलित करावी. निवडणुक वर्ष लक्षात घेता याबाबींचा देखिल विचार करावा. त्यास अनुसरुन मैदाने | दि.११/३/२४ |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | भाडयाने देणे बाबत धोरण तयार करावे. | |
| २१. | स्टेशनरी खर्चात कपात | श्री. रवि पवार, उपायुक्त उपायुक्त (भांडार) | पाणी पुरवठा, कर इ. विभाग वगळता इतर विभागांच्या स्टेशनरी खर्चात कपात झाल्याचे उपायुक्त (भांडार) यांनी बैठकीत सांगितले. स्टेशनरी वापरावर नियंत्रण ठेवण्याकरिता संगणक आज्ञावलीचा वापर करावा. | दि.11/3/24 |
| २२. | स्पोर्टस् कॉम्पलेक्स मध्ये भाग घेत असलेल्या लाभार्थ्यांची नावे | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त<br>श्रीम. दिपाली पोवार, समाज विकास अधिकारी | जास्तीत जास्त खेळाडूंना लाभ घेता यावा याकरिता आयुक्ताची आवाहन करणारी व्हिडीओ क्लीप तयार करुन प्रसिध्दी द्यावी. | दि.4/2/24 |
| २३. | सोलार प्लांट | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | कार्यवाही प्रस्तावित करावी. | दि.11/3/24 |
| २४. | कामगारांचे वेतन | सर्व खाते प्रमुख | ज्या ठेकेदारांना कर्मचाऱ्यांच्या वेतन समस्या बाबत दिलेल्या नोटीशीची नोंद घेतली नाही अशा ठेकेदारांचा ठेका रद्द करावा. व त्याठिकाणी नवीन ठेकेदार नेमण्याची कार्यवाही प्रस्तावीत करावी. | दि.11/3/24 |
| २५. | ठेकेदारांनी ठेक्यावरील कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासाठी स्वतंत्र खाते उघडणे. | श्री. संभाजी पानपट्टे, अति आयुक्त<br>श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | पुढील ठेका कर्मचारी पुरवठा करण्यासाठी निविदा काढताना सर्व कर्मचाऱ्यांना 10 ता. पर्यंत वेतन अदा करावे. तसेच वेतनासाठी स्वतंत्र खात उघडयात यावे अशी अट नमुद करावी. | नियमित |
| २६. | शालेय विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (शिक्षण) | पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना त्याच शाळेत, शाळेय वेळेनंतर अभ्यासिका उपलब्ध करुन द्यावी. आवश्यकता असल्यास तेथील शिक्षकास काही स्वतंत्र भत्ते देता येतील का त्याचा अभ्यास करावा. | दि.4/3/24 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| २७. | आयुक्त दालन व निवास स्थानी सीसी टिव्ही करता मोठी स्क्रीन बसविणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (संगणक) | शहरातील अनधिकृत फेरीवाले, अतिक्रमणे, रस्त्यांची कामे व नागरीकांच्या समस्याचे सीसीटीव्हीव्दारे निरिक्षण करता येण्यासाठी आयुक्त दालन व निवास स्थानी मोठी सीसी टिव्ही स्क्रीन बसविण्यात यावी. | दि.11/3/24 |
| २८. | पेणकरपाडा कर्मशियल इमारत ताब्यात घेणे. | श्री. पुरुषोत्तम शिंदे (संसनर) | ॲमेनिटी मधील श्री. जॉर्डन या व्यवसायिकाकडून पेणकरपाडा येथील कर्मशियल इमारत ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु करावी. | दि.4/3/24 |
| २९. | सॉल्ट लँड चे मुल्यांकन काढणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (मिळकत) | महापालिकेच्या विकासकामासाठी आवश्यक असणाऱ्या सॉल्ट लँडचे सर्वेक्षण करुन त्यांचे तातडीने मुल्यांकन करुन घ्यावे. | दि. 4/3/24 |
| ३०. | धोकादायक झांडाचा सर्वे करणे. | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त | पावसाळयात झाडे पडण्याचे प्रमाण लक्षात घेता. जी झाडे प्रथम दर्शनी धोकादायक वाटत आहेत त्यांचा सर्वे करावा. | दि.11/3/24 |
| ३१. | मिरा भाईंदर क्षेत्रातील मौजे घोडबंदर स.क्र.१०४ वर ३ दुकाने बांधली आहेत आणि घोडबंदर स.क्र.८१ व ९१ मध्यभागी नाल्यावर २ खोल्या करुन आणि शेड बांधुन बेकायदेशिर बांधकाम केलेले या बेकायदेशिर काम झाले ते तोडण्यात यावे. | श्री. संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त<br>श्री. रवि पवार, उपायुक्त (अति. नियं.) | कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करुन कार्यवाही करावी. | दि.4/3/24 |
| ३२. | फिजीयो थेरपी सेंटर | श्रीम. कल्पीता पिंपळे, उपायुक्त | समाज विकास विभागाने थेरपी सेंटर मधील फिजीयो थेरपीस्ट यांना मासिक वेतन देता यावे यासाठी प्रस्ताव सादर करावा.<br>महापालिका दिव्यांग व्यक्तींना देत असलेल्या सुविधा बाबत चित्रफित तयार करुन या सेवेचा लाभ जास्तीत जास्त गरजू पर्यंत पोचेल यासाठी प्रसिध्दी द्यावी. | दि.11/3/24 |

उपरोक्त सुचनांची विहीत मुदतीत अंमलबजावणी होईल याची संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी. पुढील बैठकीत या विषयांचा आढावा घेण्यात येईल.

(**संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
**सर्व संबंधित अधिकारी**
मिरा भाईंदर महानगरपालिका.